**<u>नियमित दिवाणी दावा क्र.१२८/२००३ मधील नि.क्र. ११९ वरील आदेश</u>**
( पारीत दिनांक – ०६/१२/२०२५)

श्रीमती नवसाबाई मारुती ताडे (मयत वारस) वगैरे वि. श्री. खंडु गोपाळ मोरे वगैरे

**CNR MHKO130002112003**

**०१.** प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी त्यांच्याविरुध्द दि. ०८/१२/२०२३ रोजी झालेला 'पुरावा बंद' असा आदेश रद्द करुन मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादीच्या कथनानुसार, प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द वाटपासाठी, हक्कज्ञापनासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. सदर कामी वादी क्र. २–अ चा सरतपास देवून त्यांचा उलटतपासही झालेला आहे. वादी क्र. १ या मयत झाल्याने वादी क्र. १ ने करुन ठेवलेल्या मृत्यूपत्रान्वये त्यांचे वारस रेकॉर्डवर घेतलेले आहेत. सदर मृत्युपत्रावरील साक्षीदाराचा सरतपास देवून उलटतपास झालेला आहे. वादी क्र. १ ने करुन ठेवलेल्या मृत्यूपत्रावरील साक्षीदाराचा उलटतपास झालेनंतर श्री.अशोक बाळकृष्ण कांबळे यांचा सरतपास पुरावा देणे तसेच किरण बाळकृष्ण कांबळे यांचा पुरावा सदर मृत्युपत्रावरील साक्षीदार घेणे आवश्यक आहेत. परंतु, दि. ०८/१२/२०२३ रोजी वादीचा 'पुरावा बंद' केलेचा आदेश पारित झाला आहे. सदर आदेश रद्द होवून वादीस पुरावा करणेस परवानगी मिळणेसाठी सदर अर्ज दाखल केला आहे. वादीने पुरावा देणेस कोणत्याही प्रकारे हेळसांड केलेला नाही, दि. ०८/१२/२०२३ रोजी वादीचे वकीलांचे घरी धार्मिक कार्यक्रम असल्याने वादीचे वकीलांना मे.कोर्टात हजर राहून पुरावा देता आला नाही. तसेच वादी व साक्षीदार वेगवेगळया गावचे रहिवाशी असल्याने वादींना वेळेत वकीलांना भेटता आले नाही. प्रस्तुत दाव्याच्या कामी मुळ वादी यांनी करुन ठेवलेल्या मृत्यूपत्राबाबत प्रस्तुत वादी यांना कायदेशीर हक्क प्राप्त होतो की नाही याबाबतची शहानिशा ही सदरची मृत्युपत्रे तोंडी पुराव्याआधारे शाबीत होणार असल्याने वादींना पुरावा करणे आवश्यक आहे. वादीस त्यांचा जादा पुरावा करणेस परवानगी नाकारली तर वादी यांना त्यांची बाजू शाबीत करण्यास व दावा मिळकतीमधील हक्क मागण्याचा कायदेशीर हक्कावर गदा येवून वादीचे कधीही पैशाने भरुन न येणारे नुकसान होणार आहे. त्यामुळे, वादीविरुध्द झालेला 'पुरावा बंद' असा आदेश रद्द करुन वादींना जादा पुढील पुरावा करणेस परवानगी मिळणेकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आला आहे.

**०३.** सदर अर्जास प्रतिवादी क्र. ३ यांनी (नि.१२२) वर त्यांचे म्हणणे दाखल केले असून अर्जातील संपूर्ण कथने चुकीची, खोटी व लबाडीची व दिशाभूल करणारी आहेत. वादीचा पुढील पुरावा करणेबाबत परवानगीसाठी दिलेली कारणे दावेतील, रोजनामेतील नोंदीवरुन खोटी व मतलबी असल्याचे स्पष्ट होते. वादी यांनी प्रस्तुत कामी

तोंडी पुरावा करणेस नेहमीच दिरंगाई व विलंब केलेला आहे. सदरचा दावा सन २००३ सालचा असून अद्याप प्रलंबित आहे. वादीतर्फे वादी क्र. २ चे वारस किरण बाळकृष्ण कांबळे यांचा जबाब दि. ०७/०८/२०१४ रोजी झालेला असून साक्षीदार श्री. प्रकाश बाळकृष्ण कांबळे यांचा जबाबही दि. ०४/०७/२०२३ रोजी झालेला आहे. त्यानंतर, मे.कोर्टानी वादीना त्यांचा पुढील पुरावा करणेस कितीतरी वेळा संधी दिलेली होती परंतु वादीचे वकीलांनी पुढील पुरावा केला नाही. त्यामुळे, ब–याच तारखेची संधी देवूनही मे.कोर्टानी दि. ०८/१२/२०२३ रोजी पुरावा बंद करणेचा योग्य व कायदेशीर आदेश केला आहे. प्रस्तुत प्रतिवादी क्र. ३ हे सदर कामी सन २००३ पासून नियमित प्रत्येक तारखेस हजर राहतात. अशा स्थितीत सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रस्तुत प्रतिवादींचेवर अन्यायच होणार आहे. सबब, सदरचा अर्ज खर्चासह नामंजूर करणेत यावा अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे. प्रतिवादी क्र.१ तर्फे दाखल पुरसिस (नि.१२३) अन्वये प्रतिवादी क्र. १ यांनी प्रतिवादी क्र. ३ यांनी दिलेले म्हणणे मान्य करुन सदरचे म्हणणे त्यांचेतर्फे वाचण्यात येणेबाबत कथन केले. वारंवार पुरेशी संधी देवूनही प्रतिवादी क्र. २ तर्फे प्रस्तुत अर्जात म्हणणे दाखल केले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ चे म्हणणेविना पुढे चालविण्यात येतो.

**४.** वादी व प्रतिवादी क्र. १ व ३ यांच्या विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वारंवार पुरेशी संधी देवूनही प्रतिवादी क्र. २ तसेच त्यांचेतर्फे युक्तीवादासाठी कोणीही हजर न झाल्याने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. २ चे युक्तीवादाविना पुढे चालविण्यात येतो. अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले.

**०५.** अभिलेखाचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, प्रस्तुत प्रकरणी दावा हा कब्जासाठी, हक्कज्ञापनासाठी व वाटपासाठी दाखल केलेला आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, माझे विद्वान पिठासीन पुर्वाधिकारी यांनी नि. १ वरील दि. ०८/१२/२०२३ रोजीच्या आदेशानुसार वादी यांचा पुरावा बंद केलेला आहे. तद्नंतर प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दि.२८/०३/२०२४ रोजी दाखल केलेला आहे. महत्वाचे म्हणजे, अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, माझे विद्वान पिठासीन पुर्वाधिकारी यांनी दि.१०/०९/२०१४ रोजीच्या नि.१ वरील आदेशान्वये वादीचा पुरावा बंद केलेला होता. त्याअनुषंगाने वादींनी सदरचा आदेश रद्द करण्याच्या अनुषंगाने दाखल केलेला अर्ज नि.८७ वरील दि. ०९/१०/२०१४ रोजीच्या आदेशान्वये सदरचा आदेश रद्द करण्यात आला. अर्जातील नमुद कथनांच्या पुष्ठर्थ वादीने शपथपत्र दाखल केलेले आहे. वादींनी प्रस्तुत दाव्याच्या अनुषंगाने वादीतर्फे साक्षीदार प्रकाश बाळकृष्ण कांबळे, किरण बाळकृष्ण कांबळे, यांचा पुरावा अभिलेखावर नोंदविलेला आहे. वादींनी अर्जात केलेली कथने ही शपथेवरती आहेत.

त्यामुळे, ती ग्राहय धरावी लागतील. नैसर्गिक न्यायतत्वाचा विचार करता, वादीस पुरावा देण्याची संधी देणे योग्य राहील तसे न झाल्यास याकामी त्रुटी राहण्याची शक्यता नाकारता येणार नाही. किंबहुना, तसे न झाल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे उल्लंघन होईल. प्रस्तुतचा दावा जवळपास २० वर्षांहूनही जुना आहे. वादींच्या सदर कृत्यामुळे याकामी जो विलंब झालेला आहे त्याकरीता काही रक्कम वादींवर खर्च म्हणून बसविणे योग्य राहील. सबब, खालील आदेश पारित करण्यात येतोः-

## – आ दे श –

१) अर्ज (निशाणी क्र.११९) वादी यांनी प्रतिवादी यांना प्रत्येकी रक्कम रुपये १५००/- ही खर्च स्वरुपात देण्याच्या अटीवर वादीचा 'पुरावा बंद' केलेचा आदेश रद्द करण्यात येतो.

PRANITA SUHAS PATIL — Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2025.12.06 17:08:31 +0900

कागल. **(प्रणिता एस.पाटील)**

दिनांक – ०६/१२/२०२५ सह. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कागल.